सोमवार दि. ३१ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३६० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## महावितरणच्या पोलवरील जर्मन तारांसह शेतकऱ्यांच्या मोटारी, वायर चोरणारी टोळी जेरबंद

### सहा आरोपी अटकेत, १३ गुन्हे उघडकीस; ८.१४ लाखांचा मुद्देमाल व दोन पिकअप वाहनांसह तब्बल; २०.१४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**बदनापूर । प्रतिनिधी**

महावितरणच्या विद्युत पोलवरील जर्मन तार, शेतातील पाण्याच्या मोटारी, मोटार केबल तसेच सोलार वायर चोरी करून शेतकऱ्यांना त्रस्त करणाऱ्या टोळीचा बदनापूर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. गेल्या काही दिवसांपासून बदनापूर तालुक्यातील विविध गावांच्या शिवारात सुरू असलेल्या या चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली होती. अखेर बदनापूर पोलिसांच्या तीन तपास पथकांनी तांत्रिक तपासाच्या आधारे या टोळीचा छडा लावत सहा आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत तब्बल १३ चोरीचे गुन्हे उघडकीस आले असून, ८ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल तसेच दोन पिकअप वाहने असा एकूण २० लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



महावितरणच्या पोलवरील विद्युत तार चोरीला जाण्याच्या घटना काजळा, पानखेडा, ढोकसाळ, रोषणगाव, हलदोला आणि बदनापूर परिसरात घडल्या होत्या. त्याचबरोबर कडेगाव शिवार, वाघ्राळ-दाभाडी, डोंगरगाव आणि चनेगाव शिवारात शेतकऱ्यांच्या पाण्याच्या मोटारी, मोटार केबल, वायर तसेच सोलार वायर चोरीच्या घटना घडल्या होत्या. वारंवार होणाऱ्या या चोऱ्यांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याबरोबरच शेतीसाठी आवश्यक असलेली विद्युत व्यवस्था आणि पाणीपुरवठाही विस्कळीत होत होता.

**चोरीच्या घटनांनी शेतकरी चिंतेत**

शेतातील विद्युत मोटारी आणि केबल चोरीला जाण्याचे प्रकार वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. रात्रीच्या वेळी शेतशिवारात चोरट्यांकडून विद्युत तार व मोटारी चोरल्या जात असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. महावितरणच्या पोलवरील तार चोरीमुळे काही ठिकाणी विद्युत पुरवठ्यावरही परिणाम होत होता.

या घटनांना आळा घालून आरोपींना जेरबंद करणे हे बदनापूर पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी तपासाला गती दिली.

**तीन तपास पथकांची स्थापना**

जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी या चोरीच्या घटनांची गांभीर्याने दखल घेत बदनापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एम.टी. सुरवसे यांना आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलिसांनी तीन स्वतंत्र तपास पथके स्थापन केली. गेल्या सुमारे १५ दिवसांपासून या पथकांनी विविध दिशांनी तपास सुरू ठेवला. चोरीच्या घटनांचा (पान २ वर)

## गरिबांच्या हातावर राखी बांधत निकिता काळेंनी जपली माणुसकीची नाती

**जालना - प्रतिनिधी**

आज दिनांक ३० रविवार रोजी सकाळी ९ वाजता मिळालेल्या माहितीनुसारजालना : रक्षाबंधन म्हणजे केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नव्हे, तर माणुसकीच्या नात्यांची जपणूक करण्याचा दिवसही आहे. याच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत जालना शहरातील युवती पत्रकार निकिता काळे यांनी यंदाचे रक्षाबंधन अनोख्या पद्धतीने साजरे केले.निकिता काळे यांनी जालना शहरातील रेल्वे स्टेशन, एसटी स्टँड तसेच मंदिर परिसरात जाऊन गरजू







आणि भीक मागून उदरनिर्वाह करणाऱ्या बांधवांच्या हातावर राखी बांधली. समाजातील उपेक्षित घटकांनाही सणाचा आनंद मिळावा आणि त्यांना आपलेपणाची जाणीव व्हावी, या भावनेतून त्यांनी हा उपक्रम राबविला.रक्षाबंधनाच्या दिवशी अनेक जण आपल्या कुटुंबातील भावांना राखी बांधून हा सण साजरा करतात. मात्र, निकिता काळे यांनी रक्ताच्या नात्यापलीकडे जाऊन 'माणुसकी हेच खरे नाते' या भावनेतून गरजू बांधवांना आपले भाऊ मानत त्यांच्या हातावर राखी बांधली.या वेळी राखी बांधताना गरजू बांधवांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि आपुलकीचे भाव पाहायला मिळाले. निकिता काळे यांच्या या उपक्रमातून समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने आणि आपलेपणाने जगण्याचा अधिकार असल्याचा संदेश देण्यात आला.पत्रकारिता केवळ बातम्या मांडण्यापुरती मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून केलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. माणुसकी, संवेदना आणि सामाजिक जाणीव जपणाऱ्या या रक्षाबंधनामुळे शहरात एक सकारात्मक संदेश पोहोचला.

## अपुऱ्या नुकसान भरपाईला चाप, ग्राहक आयोगाच्या निकालाने कंपन्यांना बसणार दणका!

**जालना - प्रतिनिधी**

सदोष मोबाईल सिमकार्डमुळे परदेशात मनस्ताप सहन करावा लागलेल्या ग्राहकाला जिल्हा आयोगाने दिलेली तुटपुंजी नुकसान भरपाई वाढवून देत दिल्ली राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाने एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या निकालामुळे सेवा पुरवठादार कंपन्यांच्या मनमानी कारभाराला आळा बसेल आणि देशभरातील ग्राहकांना न्याय मिळण्यास मदत होईल, असे मत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी व्यक्त केले आहे. हा निकाल देशभरातील ग्राहकांसाठी एक आदर्श असून, कंपन्यांना त्यांच्या सेवेतील त्रुटीची मोठी किंमत मोजावी लागू शकते, हे यातून स्पष्ट झाले आहे. राजीव कुमार राखा विरुद्ध रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड (प्रथम अपील क्रमांक-२४३/२०२४) या गाजलेल्या प्रकरणात, श्री. राखा यांनी कॅनडा दौऱ्यासाठी जिओ कंपनीकडून आंतरराष्ट्रीय सिमकार्ड विकत घेतले होते. मात्र, परदेशात पोहोचल्यावर हे सिमकार्ड सक्रियच झाले नाही. यामुळे महिनाभर त्यांना आपल्या कुटुंबीयांशी, मित्रांशी संपर्क साधता आला नाही, तसेच बँकेचे व्यवहारही करता आले नाहीत. त्यांचा संपूर्ण परदेश दौरा यामुळे खराब झाला. या प्रकरणी जिल्हा ग्राहक आयोगाने कंपनीला केवळ ५,००० रुपये नुकसान भरपाई (कायदेशीर खर्चासह) देण्याचे आदेश दिले होते, जे अत्यंत अपुरे होते. (पान २ वर)

## मानाचा गणपती श्री नवयुवक गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर



**जालना - प्रतिनिधी**

काद्राबाद येथील मंदिराच्या सभागृहात मानाचा गणपती गणेश मंडळ ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आबड यांच्या नेतृत्वाखाली बैठक घेण्यात आली होती या बैठकीत सर्व अनुमते गणपती श्री नवयुवक गणेश मंडळाच्या समिती अध्यक्षपदी अल्केश अग्रवाल व सचिव ॲड. दर्शित आबड यांची निवड आज़ दि ३०-८-२०२६ रोजी सकाळी ११ वाजता झालेल्या बैठकी मध्ये सर्व सहमतीने निवड करण्यात आलेली आहे.

या वेळी मानाचा गणपती नवयुवक गणेश मंडळाचे संस्थापक व ट्रस्ट चे अध्यक्ष राजेंद्र आबड व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

मंडल च्या समिति मध्ये अध्यक्ष अल्केश अग्रवाल सचिव ॲड. दर्शित आबड़, कार्याध्यक्ष अनुराग बन्दुकवाला, उपाध्यक्ष धीरज धारीवाल, कोषाध्यक्ष संजय तालुका, व सदस्य जयेश शाह, निखिल आबड, राहुल तालुका, जितेश तालुका, सुनील अग्रवाल, रमेश दलाल, ओमकार भूतिया, किशोर अग्रवाल, विशाल बनवट, आनंद श्रीमाली, गुल्लु अग्रवाल, कृष्णा देविदान, रोहित अग्रवाल व इतर यांचा समावेश आहे.

## गणेश विसर्जन कुंड पाण्याने गच्च; सुरक्षेचा अभाव, सुशोभीकरणाचे कामही अर्धवट

### गणेशोत्सव अवघ्या बारा-तेरा दिवसांवर; जालना महानगरपालिकेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह विसर्जन जवळ आले कीच प्रशासनाला कुंडाची आठवण?

**जालना । प्रतिनिधी**

गणेशोत्सव अवघ्या बारा-तेरा दिवसांवर येऊन ठेपला असताना जालना शहरातील गणपती विसर्जनासाठी वापरण्यात येणाऱ्या कुंडाच्या व्यवस्थेकडे महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. विसर्जन कुंड सध्या पाण्याने गच्च भरलेले असून परिसरात कोणत्याही प्रकारची सुरक्षा व्यवस्था दिसून येत नाही. त्याचबरोबर कुंडाच्या सुशोभीकरणाचे कामही अर्धवट अवस्थेत असल्याने गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या तयारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गणेशोत्सव काळात हजारो भाविक गणपती विसर्जनासाठी या ठिकाणी गर्दी करतात. लहान-मोठ्या घरगुती





गणपतींसह सार्वजनिक मंडळांच्या मूर्तींचे विसर्जनही मोठ्या प्रमाणावर होत असल्याने या ठिकाणी योग्य सुरक्षा व्यवस्था, प्रकाशयोजना, बॅरिकेडिंग, प्रशिक्षित कर्मचारी, स्वयंसेवक तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध असणे गरजेचे आहे. मात्र, सध्या कुंडाची पाहणी केली असता परिस्थिती समाधानकारक नसल्याचे दिसून येत आहे.

**कुंडाकडे वर्षभर दुर्लक्ष; विसर्जन जवळ आले की प्रशासनाची धावपळ**

गणपती विसर्जनाची तारीख जवळ आली कीच महानगरपालिकेचे लक्ष विसर्जन कुंडाकडे वळते, अशी नागरिकांची नाराजी आहे. वर्षभर या कुंडाची नियमित देखभाल, स्वच्छता व सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना केल्या जात नसल्याने ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर प्रशासनाला कामांची लगबग सुरू होते.

'विसर्जन जवळ आले की झोपेतून जागे झाल्यासारखे प्रशासन कामाला लागते,' अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे. गणेशोत्सवाची तारीख आधीच निश्चित असताना शेवटच्या क्षणी कामे करण्याची वेळ का येते, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**पाण्याने भरलेल्या कुंडाभोवती सुरक्षेचे काय?**

सध्या विसर्जन कुंड पाण्याने पूर्ण भरलेले आहे. मात्र, त्याठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना अद्याप झालेल्या दिसत नाहीत. गणपती विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलेही मोठ्या संख्येने असतात. त्यामुळे कुंडाभोवती सुरक्षित कठडे (पान २ वर)

## टेंभुर्णी येथे २२ वर्षीय तरुण दुर्गेश बनकरची गळफास घेऊन आत्महत्या

### बनकर कुटुंबीयांवर कोसळला दुःखाचा डोंगर,परिसरात हळहळ

**दत्ता देशमुख**

येथील दत्त जिनिंग परिसरामध्ये राहणाऱ्या एका २२ वर्षीय तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक आणि सुन्न करणारी घटना उघडकीस आली आहे. दुर्गेश विष्णू बनकर असे आत्महत्या केलेल्या दुर्दैवी तरुणाचे नाव आहे. ऐन उभारीच्या वयात तरुण मुलाने असे टोकाचे पाऊल उचलल्याने बनकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात



आहे. वाढत्या वयातील मुलांच्या अशा अचानक जाण्याने अनेक माता-पित्यांच्या मनातील चिंता अधिकच वाढली आहे.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, बनकर कुटुंब हे मूळचे देऊळगाव राजा येथील असून अवघ्या सहा महिन्यांपूर्वीच त्यांनी टेंभुर्णी येथील दत्त जिनिंग जवळ नवीन घर बांधून तेथे वास्तव्यास सुरवात केली होती. सर्व काही सुरळीत सुरू असताना आणि संपूर्ण परिवार आनंदाने राहत असतानाच आज सायंकाळी ५:३० वाजेच्या सुमारास दुर्गेशने राहत्या घरी गळफास घेतला. कुटुंबातील सदस्यांच्या ही बाब निदर्शनास येताच त्यांनी तातडीने त्याला खाली उतरवून उपचारासाठी सरकारी दवाखान्यात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

दुर्गेशच्या आत्महत्येची बातमी वाऱ्यासारखी पसरताच टेंभुर्णी परिसरातील तरुण वर्ग आणि नागरिकांनी सरकारी दवाखान्यामध्ये मोठी गर्दी केली होती. हसतखेळत राहणाऱ्या दुर्गेशने अचानक घेतलेल्या या टोकाच्या निर्णयामुळे सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. ‘‘कोणाची नजर लागली कुणास ठाऊक,‘‘ अशी भावना याप्रसंगी उपस्थितांमधून व्यक्त होत (पान २ वर)

## दीपक रणनवरे यांचे उपोषण दुसऱ्या दिवशीही सुरूच विविध सामाजिक संघटनांनी दिला पाठिंबा

**जालना -प्रतिनिधी**

आपल्या विविध मागण्यांसाठी शनिवारपासून अन्नत्याग उपोषणास बसलेले सामाजिक कार्यकर्ते दीपक रणनवरे यांनी आपले उपोषण दुसऱ्या दिवशीही सुरूच ठेवले असून विविध सामाजिक संघटनांनी त्यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा जाहीर केला. दरम्यान, वैद्यकीय पथकाने रणनवरे यांची आरोग्य तपासणी करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

ब्राह्मण समाजातील मुला-मुलींना सर्व शिक्षण मोफत करण्यात यावे, ब्राह्मण समाजातील मुला मुलींसाठी





स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी केंद्र मंजुर करुन आवश्यक सुविधा शासनाच्या वतीने किंवा महामंडळाच्या वतीने उपलब्ध करुन देण्यात याव्यात, ईडब्ल्यूएस ची उत्पन्नाची ८ लाखाची मर्यादा हटवून १५ लाख करण्यात यावी, ब्राह्मण समाजातील विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतीगृह व परशुराम भवन उभारावे, ॲट्रासिटीच्या धर्तीवर ब्राह्मण समाजाच्या सुरक्षिततेसाठी विशेष कायदा करुन सामाजिक विडंबनातून मुक्ता करण्यात यावी, ब्राह्मण समाजातील आर्थीक मागास घटकातील तरुणांना व्यवसायिक मदतीसाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळास एक हजार कोटीची तरतुद करण्यात यावी, आदी मागण्यांसाठी दीपक रणनवरे यांनी शनिवारपासून जालना शहरातील गांधी चमनवर अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे. आज उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी धुळे, छत्रपती संभाजीनगर, अंबड तसेच जालना शहरातील विविध सामाजिक संघटनांनी त्यांची भेट घेऊन त्यांच्या उपोषणास पाठिंबा दिला. धुळे जिल्ह्यातील सिंदखेडा येथील ब्राह्मण सभेच्या पदाधिकाऱ्यांनी रणनवरे यांची भेट घेऊन त्यांच्या उपोषणास पाठिंबा दिला. यावेळी अध्यक्ष प्रदीप (पान २ वर)

# संपादकीय...

## अतिक्रमण हटविले; आता 'पुन्हा अतिक्रमण होणार नाही' याची हमी कोण देणार?

जालना शहरातील भाग्य नगर उड्डाणपुलाखाली महानगरपालिकेने १९ अनधिकृत अतिक्रमणे हटविली. आयुक्त अंजली शर्मा यांच्या निर्देशानुसार झालेल्या या कारवाईमुळे रस्ते आणि पदपथ मोकळे झाले असून, वाहतुकीला काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे. सार्वजनिक जागा नागरिकांसाठी मोकळ्या करण्याच्या दृष्टीने ही कारवाई निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, या कारवाईचे खरे मूल्यमापन '१९ अतिक्रमणे हटविली' यावर न होता 'ही जागा पुन्हा अतिक्रमणमुक्त राहणार का?' यावर झाले पाहिजे. कारण अतिक्रमण हटाव ही जालना शहरासाठी नवीन बाब नाही. अनेक ठिकाणी कारवाई होते, अतिक्रमणे हटविली जातात आणि काही काळानंतर पुन्हा त्याच जागेवर टपऱ्या, हातगाड्या किंवा अन्य स्वरूपाचे अतिक्रमण उभे राहते. त्यामुळे बुलडोझर चालविण्यापेक्षा अतिक्रमण पुन्हा उभे राहू न देणारी प्रशासनाची यंत्रणा अधिक महत्त्वाची आहे. सार्वजनिक रस्ता, पदपथ किंवा उड्डाणपुलाखालील जागा एका दिवसात अतिक्रमित होत नाही. सुरुवातीला एखादी छोटी हातगाडी लागते, त्यानंतर टपरी उभी राहते, पुढे पत्र्याचे शेड येते आणि काही काळाने त्या जागेवर कायमस्वरूपी व्यवसाय सुरू होतो. प्रश्न असा आहे की हे सर्व घडत असताना संबंधित विभागाचे कर्मचारी आणि अधिकारी कुठे असतात? महानगरपालिकेला अतिक्रमण दिसण्यासाठी नागरिकांनी तक्रार करावी लागते का? की शहरातील सार्वजनिक जागांवर नियमित देखरेख ठेवणे ही मनपाची प्राथमिक जबाबदारी आहे? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. कारवाईचे स्वागत, पण निवडकपणाचा आरोप नको

अतिक्रमण हटाव मोहीम राबविताना प्रशासनाने कोणताही भेदभाव न करता नियम सर्वांसाठी समान ठेवणे आवश्यक आहे. मोठे व्यावसायिक असोत, छोटी टपरी असो किंवा हातगाडीधारकसार्वजनिक जागा बेकायदेशीरपणे व्यापली असेल तर कायदा समानपणे लागू झाला पाहिजे. कारवाई करताना गरिबांच्या उपजीविकेचा प्रश्नही प्रशासनाने संवेदनशीलतेने हाताळला पाहिजे. परंतु उपजीविकेच्या नावाखाली सार्वजनिक रस्ता किंवा पदपथ कायमस्वरूपी व्यापण्याची मुभा देता येणार नाही. म्हणूनच कायदा कठोर आणि अंमलबजावणी निष्पक्ष असणे ही या मोहिमेची खरी कसोटी आहे. शहरातील पदपथ हे पादचाऱ्यांसाठी असतात. मात्र अनेक ठिकाणी पदपथांवर दुकानदारांचे साहित्य, हातगाड्या, टपऱ्या, वाहनांची पार्किंग किंवा इतर अडथळे निर्माण झालेले दिसतात. परिणामी पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागते. वाहतूक वाढलेल्या शहरात ही परिस्थिती अपघाताला निमंत्रण देणारी ठरू शकते. भाग्य नगर उड्डाणपुलाखालील कारवाईनंतर पदपथ खरोखरच पादचाऱ्यांसाठी उपलब्ध झाले तर त्याचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना होईल. मात्र त्यासाठी केवळ एक दिवसाची कारवाई पुरेशी नाही. अतिक्रमण हटविले; आता देखरेख कोण करणार? हीच सर्वात मोठी परीक्षा आहे. अतिक्रमण हटविल्यानंतर संबंधित जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी मनपाने नियमित गस्त, सीसीटीव्ही, क्षेत्रनिहाय जबाबदारी आणि तक्रार निवारण यंत्रणा प्रभावी करणे आवश्यक आहे. एखाद्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला विशिष्ट क्षेत्राची जबाबदारी दिली आणि त्या क्षेत्रात पुन्हा अतिक्रमण झाले, तर त्याची जबाबदारी निश्चित करण्याची व्यवस्था असली पाहिजे.

अतिक्रमण हटविणे ही कारवाई; अतिक्रमण होऊ न देणे ही प्रशासनाची कार्यक्षमता. या दोन गोष्टींमध्ये मोठा फरक आहे. जालना शहरात अतिक्रमणे वाढण्यामागे केवळ नागरिक किंवा छोटे व्यावसायिक जबाबदार आहेत असे म्हणणे सोपे आहे. पण अतिक्रमणाला जागा उपलब्ध होतेच कशी, याचाही विचार करावा लागेल. फेरीवाले आणि हातगाडीधारकांसाठी नियोजित जागा आहेत का? लघु व्यावसायिकांसाठी पर्यायी व्यवस्था आहे का? वाहतूक आणि पादचारी मार्गांचे नियोजन पुरेसे आहे का? या प्रश्नांवर दीर्घकालीन उत्तर शोधले नाही तर आज हटविलेली अतिक्रमणे उद्या दुसऱ्या स्वरूपात परत येऊ शकतात.

महानगरपालिका प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहीम सुरू ठेवण्याची भूमिका घेतली आहे. ही भूमिका केवळ निवेदने आणि प्रसिद्धीपत्रकापुरती मर्यादित राहता कामा नये.

शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, पदपथ, उड्डाणपुलाखालील जागा, बसस्थानक परिसर, शासकीय कार्यालयांच्या आसपासचे रस्ते आणि वाहतुकीच्या दृष्टीने संवेदनशील ठिकाणे यांचे नियमित सर्वेक्षण झाले पाहिजे. एका भागात कारवाई करून दुसऱ्या भागात अतिक्रमण वाढत असेल तर मोहिमेचा अपेक्षित परिणाम साधला जाणार नाही. अतिक्रमण हटविण्यासाठी झालेला खर्च संबंधित अतिक्रमणधारकांकडून वसूल करण्याची भूमिका प्रशासनाने घेतली आहे. ही भूमिका कायद्याच्या चौकटीत प्रभावीपणे राबविली गेल्यास त्याचा प्रतिबंधात्मक परिणाम होऊ शकतो. मात्र, खर्च वसुलीची प्रक्रिया पारदर्शक असावी. कोणत्या अतिक्रमणावर किती खर्च झाला, किती वसुली झाली आणि किती प्रकरणे प्रलंबित आहेत, याची माहिती प्रशासनाने सार्वजनिक केली तर नागरिकांचा विश्वास वाढेल. जालना शहराचा विस्तार होत आहे. वाहनांची संख्या वाढत आहे. बाजारपेठा विस्तारत आहेत. अशा परिस्थितीत केवळ अतिक्रमण हटवून शहराचा प्रश्न सुटणार नाही.

पार्किंगची व्यवस्था, फेरीवाला धोरण, पदपथांचे संरक्षण, वाहतूक नियोजन, सार्वजनिक जागांचे व्यवस्थापन आणि भविष्यातील शहर विकास आराखडा याकडेही समान गांभीर्याने पाहावे लागेल. अतिक्रमण ही अनेकदा शहर नियोजनातील पोकळीची लक्षणे असतात. त्यामुळे लक्षणावर बुलडोझर चालविण्याबरोबरच मूळ कारणावरही उपचार करणे आवश्यक आहे. भाग्य नगर उड्डाणपुलाखालील १९ अतिक्रमणे हटविण्याची महानगरपालिकेची कारवाई योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. मात्र, नागरिकांना या कारवाईनंतर एकच अपेक्षा आहे. आज मोकळी केलेली जागा उद्या पुन्हा व्यापली जाऊ नये. आयुक्त अंजली शर्मा यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने अतिक्रमणाविरोधात कठोर भूमिका घेतली असेल तर आता त्याला सातत्याची जोड मिळणे आवश्यक आहे.

जालना शहराला केवळ 'अतिक्रमण हटाव मोहीम' नको; तर 'अतिक्रमण पुन्हा होणार नाही' अशी कायमस्वरूपी व्यवस्था हवी आहे. कारवाईचे फोटो प्रसिद्ध होणे महत्त्वाचे नाही; मोकळे झालेले रस्ते आणि पदपथ वर्षभर मोकळे राहणे महत्त्वाचे आहे. बुलडोझरचा आवाज एक दिवस ऐकू येतो; पण सुशासनाचा परिणाम दररोज दिसला पाहिजे.

## हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद राष्ट्रीय खेळांचे शिल्पकार

२९ ऑगस्ट १९०५ मध्ये मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला व सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे तेजोमय लखलखता तारा या भारत भुमित जन्माला आला आणि दैवी शक्तीच्या रूपात हॉकीचा शहनशहा निर्माण झाला.मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय खेळ दिवस म्हणून संपूर्ण भारतात साजरी केली जाते.हा दिवस संपूर्ण खेळाडूंसाठी सुवर्ण दिवस आहे. मेजर ध्यानचंद हे कर्तबगार,जिद्दी आणि चीकाटी वृत्तीचे महान खेळाडू होते. त्यांच्या खेळाकडे संपूर्ण जगाचे लक्ष रहात होते. कारण त्यांच्या खेळण्यात मोठी जादू होती.त्यामुळेच त्यांना हॉकीचे जादुगार म्हणतात.मेजर ध्यानचंद यांच्या कारकिर्दीत १९२८, १९३२, १९३६अशा प्रकारे तिनं वेळा गोल्डन कामगिरी बजावुन देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य केले.यातुन ते संपूर्ण जगात हॉकीचे जादुगार म्हणून प्रसिद्ध झाले.आज आपल्याला देशात राष्ट्रीय खेळांचा जो बोलबाला आणि लौकिकता दिसत आहे. त्याचे संपूर्ण क्षेय मेजर ध्यानचंद यांना जाते आणि यातूनच देशातील खेळाडूंना मानसन्मान मीळत आहे. हॉकी सोबतच कबड्डी, भालाफेक, थाळी फेक, खो-खोसह अशा अनेक मातीतील राष्ट्रीय खेळांना मोठे स्थान मिळविले आहे.यामुळे खेळाडूंचे होसले बुलंद झाल्याचे दिसून येते. देशात खासदार क्रीडा महोत्स किंवा इतर माध्यमातून खेळांना महत्व देऊन खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण केली जाते.याच अनुषंगाने अनेक खेळांचे मोठ्या प्रमाणात आयोजन वेगवेगळ्या राज्यांमध्ये केले जाते. राष्ट्रीय खेळांना सकारात्मक भूमिका देण्याचे क्षेय मेजर ध्यानचंद यांच्या प्रयत्नातूनच साकार होत आहे. आपण पहातो की आज देशातील महत्वपूर्ण संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचले आहे. त्यामुळे आपण पहातो की आज राष्ट्रीय खेळांचा बोलबाला आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. कबड्डी हा राष्ट्रीय खेळ होता आता आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन पोहोचला आहे ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे.भारताने राष्ट्रीय खेळांमध्ये अव्वल स्थान मिळवून देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य देशाच्या खेळाडूंनी केले.त्यामुळे आपण समजू शकतो की राष्ट्रीय खेळ अत्यंत शक्तीशाली आणि महत्वपूर्ण आहेत. भारतीय खेळाडू देशात-विदेशात जावुण राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावुन सुवर्ण पदक, रौप्य पदक व कांस्य पदक प्राप्त करून तिरंग्याची शान उंचावतात.त्यामुळे देशातील तळागाळातील संपूर्ण खेळाडूंना माझा सलाम. कॉमनवेल्थ गेम, ऑलिंपिक खेळ, पॅराऑलिम्पिकमध्ये राष्ट्रीय खेळ मोठ्या प्रमाणात दिसून येते व राष्ट्रीय खेळांमुळेच आपण आज जगात आपली आगळावेगळी छाप सोडली आहे व पकड मजबूत केली आहे.याचाच आनंद देशातील १४५ कोटी जनता नेहमी घेत असते.आज खेळांच्या बाबतीत असो वा अन्य बाबतीत संपूर्ण जग भारतासमोर नतमस्तक होतांना दिसते.याचे मुख्य कारण म्हणजे मेजर ध्यानचंद यांच्या सारख्या खेळाडूंनी घालून दिलेली जडणघडण व आपल्या पुर्वजांनी जे मातीतील खेळ आपल्याला शिकवीले त्यातूनच आज संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचल्याचे दिसून येते. त्याकाळी जगातील नामांकित व्यक्ती मेजर ध्यानचंद यांची हॉकी खेळण्याची कला पहाण्यासाठी उत्सुक असायचे.कारण लोकांना वाटायचं की त्यांच्या हॉकी स्टिकमध्ये चुंबक आहे की काय असे वाटत होते.१९३५ साली विश्वविख्यात क्रीकेटपटु डॉन ब्रॅडमन मेजर ध्यानचंद यांना भेटले.त्यांनी त्यांच्या हॉकीतील चेंडू वळवीचे सामर्थ्य पाहून कौतुक केले म्हणाले ध्यानचंदजी खरोखरच आपल्या खेळण्यात व खेळात जादू आहे.१९३६ साली बर्लिन येथे जर्मनीचा हुकुमशाह एडॉल्फ हिटलर हा हॉकीचा अंतिम सामना पहात होता. त्यामुळे खेळाडुंच्या बाबतीत मी सरकारला विनंती करतो की देशातील कोणत्याही खेळाडूंवर अन्याय होत असेल तर त्याच्या विरोधात ताबडतोब कारवाई व्हायला हवी. कारण प्रत्येक खेळाडू देशाची आन-बान-शान आहे.त्याचा मान-सन्मान सर्वच स्तरातून व्हायला हवा यात कोणत्याही प्रकारचे राजकारण नकोच.तेव्हाच खेळाडूंची मान उंचावेल.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

# पान १ व ४ वरुन...

### महावितरणच्या पोलवरील...

घटनाक्रम, संशयितांची हालचाल, वाहनांचा वापर तसेच तांत्रिक बाबींचा अभ्यास करण्यात आला. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांना आरोपींपर्यंत पोहोचण्यात यश आले.

**१३ गुन्ह्यांचा छडा**

तपासादरम्यान पोलिसांनी संशयित आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता विविध ठिकाणी केलेल्या चोरीच्या घटनांची माहिती समोर आली. पोलिसांनी या प्रकरणात तब्बल १३ गुन्हे उघडकीस आणले आहेत. आरोपींकडून चोरीस गेलेल्या विद्युत तारा, मोटारी, केबल, सोलार वायर आदी मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याशिवाय चोरीसाठी वापरण्यात येणारी दोन पिकअप वाहनेही पोलिसांनी जप्त केली आहेत. जप्त मुद्देमालाची किंमत ८ लाख १४ हजार रुपये, तर दोन पिकअप वाहनांची किंमत सुमारे १२ लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यामुळे या कारवाईत एकूण २० लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**सहा आरोपी अटकेत**

या प्रकरणात पोलिसांनी दिलीप गणेश शिंदे (रा. फुलेनगर, बदनापूर), विकास भाऊसाहेब मांदळे (रा. मातोश्री नगर, रेल्वे स्टेशन, बदनापूर), विजय बाबुराव पाखरे (रा. साठेनगर, अंबड), संतोष तुकाराम पवार (रा. शेवगा, ता. अंबड), अभिजीत विष्णू गारोळे (रा. नेहरू नगर, परभणी) आणि युसुफखान हनीफखान (रा. काबरानगर, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर) या आरोपींना अटक केली आहे.

तसेच अब्दुल माजिद अब्दुल कदिर (रा. बदनापूर) आणि चांद मीर बागवान (रा. दाभाडी) यांच्यावरही या प्रकरणात कारवाई करण्यात आली आहे. अटक आरोपींना न्यायालयाने सध्या पाच दिवसांची पोलीस कोठडी () सुनावली आहे.

**आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता**

आरोपींकडून करण्यात आलेल्या चौकशीतून चोरीच्या घटनांची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. या टोळीने आणखी कोणत्या ठिकाणी चोरी केली आहे का, चोरीचा मुद्देमाल कोठे विकला जात होता, या गुन्ह्यांमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत तार, मोटार आणि केबल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी बदनापूर पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे शेतकरी वर्गातून स्वागत होत आहे. चोरीला गेलेला मोठ्या प्रमाणातील मुद्देमाल हस्तगत झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पोलीस निरीक्षक एम.टी. सुरवसे, पोलीस उपनिरीक्षक कुकलारे, सहायक फौजदार इस्माईल शेख, पोलीस हेड कॉन्स्टेबल अंकुश दासर, रंजीत मोरे, पोलीस कॉन्स्टेबल एस. जे. तडवी, पी. के. गोलवाल, परमेश्वर ढगे, भडांगे, रतन गोरे, देहंगळ आणि आर. डी. सानप यांच्या पथकाने या कारवाईत सहभाग घेतला.

बदनापूर पोलिसांच्या या कारवाईमुळे महावितरणच्या पोलवरील तार तसेच शेतकऱ्यांच्या मोटारी, केबल व सोलार वायर चोरीच्या घटनांना मोठ्या प्रमाणात आळा बसण्यास मदत होणार आहे. मात्र, शेतशिवारात चोरीच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पोलिसांनी गस्त वाढविण्याबरोबरच शेतकऱ्यांनीही रात्रीच्या वेळी सतर्क राहून संशयास्पद हालचालींची माहिती तातडीने पोलिसांना देण्याचे आवाहन केले आहे.

### अपुऱ्या नुकसान...

जिल्हा आयोगाच्या निर्णयावर नाराजी व्यक्त करत श्री. राखा यांनी राज्य आयोगात अपील दाखल केले. राज्य आयोगाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत नुकसान भरपाई या शब्दाची व्यापकता स्पष्ट केली. आयोगाच्या मते, नुकसान भरपाई म्हणजे केवळ वस्तूची किंमत परत करणे नव्हे, तर ग्राहकाला झालेला मानसिक त्रास, मनस्ताप, आर्थिक नुकसान आणि कायदेशीर लढ्यासाठी आलेला खर्च या सर्वांचा त्यात समावेश होतो. आयोगाने जिल्हा आयोगाचा निर्णय बदलत, रिलायन्स जिओला सिमकार्डची रक्कम व्याजासह परत करण्यासोबतच, मानसिक त्रासापोटी १०,००० रुपये आणि कायदेशीर खर्चापोटी ५,००० रुपये अशी एकूण १५,००० रुपयांची वाढीव भरपाई देण्याचे आदेश दिले. या निकालावर प्रतिक्रिया देताना ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले की, ''हा निकाल सामान्य ग्राहकाचा मोठा विजय आहे. अनेकदा मोठ्या कंपन्या आपल्या सेवेतील त्रुटीसाठी ग्राहकांना नाममात्र रक्कम देऊन प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न करतात. मात्र, या निकालाने स्पष्ट केले आहे की, ग्राहकाच्या त्रासाचे आणि वेळेचे मूल्य कमी लेखता येणार नाही. आयोगाने केवळ सिमकार्डची किंमत परत न करता, मानसिक त्रासासाठी आणि कायदेशीर खर्चासाठी स्वतंत्रपणे भरपाई मंजूर केली, ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे.''

हा निकाल दिल्ली राज्याचा असला तरी, ग्राहक संरक्षण कायदा हा एक केंद्रीय कायदा असल्याने या निकालाचा आधार महाराष्ट्र आणि विशेषतः जालना जिल्ह्यातील ग्राहकही घेऊ शकतात, असे ॲड. धन्नावत यांनी स्पष्ट केले. जालना जिल्ह्यातील कोणत्याही ग्राहकासोबत अशा प्रकारची सेवा त्रुटी घडल्यास, ते या निकालाचा संदर्भ देऊन जिल्हा ग्राहक मंचात दाद मागू शकतात. कंपन्यांकडून मिळणाऱ्या तुटपुंज्या मोबदल्यावर समाधान न मानता, झालेल्या त्रासासाठी योग्य आणि पुरेशा नुकसान भरपाईसाठी कायदेशीर लढा दिला पाहिजे.

थोडक्यात, या निकालाने ग्राहक हक्कांना अधिक बळकटी दिली असून, सेवा पुरवठादार कंपन्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली आहे. ग्राहकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहावे आणि कोणत्याही अन्यायाविरुद्ध आवाजउठवावा, असे आवाहन ॲड. महेश एस. धन्नावत यांनी केले आहे. यामुळे कंपन्यांच्या सेवा गुणवत्तेत सुधारणा होण्यासही मदत होईल.

### गणेश विसर्जन...

बॅरिकेडिंग, पुरेशी प्रकाशयोजना आणि सुरक्षा कर्मचारी असणे अत्यावश्यक आहे.

विसर्जनाच्या वेळी गर्दी वाढल्यास एखादी दुर्घटना घडू नये यासाठी महापालिका प्रशासनाने आतापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. केवळ विसर्जनाच्या दिवशी तात्पुरती व्यवस्था करण्याऐवजी कायमस्वरूपी सुरक्षिततेच्या दृष्टीने नियोजन करण्याची मागणी होत आहे.

**सुशोभीकरणाचे काम अर्धवट**

गणेश विसर्जन कुंडाच्या परिसरातील सुशोभीकरणाचे कामही अद्याप पूर्ण झालेले नसल्याचे दिसून येत आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परिसर स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित करण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध असतानाही कामे अपूर्ण का ठेवण्यात आली, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वीच कुंड परिसरातील सर्व कामे पूर्ण करून भाविकांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा आधीच दक्षता घ्या**

गणेश विसर्जनाच्या वेळी मोठ्या प्रमाणात गर्दी होणार असल्याने कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी महानगरपालिकेने आतापासूनच ठोस नियोजन करणे आवश्यक आहे. कुंडाची स्वच्छता, पाण्याची सुरक्षित पातळी, बॅरिकेडिंग, सुरक्षा कर्मचारी, अग्निशमन व आपत्कालीन पथक, प्रथमोपचार केंद्र, पुरेशी प्रकाशयोजना आणि वाहतूक नियोजन याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

गणेशोत्सव हा श्रद्धेचा आणि उत्साहाचा सण असल्याने भाविकांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये. महापालिका प्रशासनाने तातडीने विसर्जन कुंडाची पाहणी करून अपूर्ण कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत आणि विसर्जनाच्या दिवसापूर्वी सर्व आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### टेंभुर्णी येथे २२...

होती. मृत दुर्गेश याच्या पश्चात आई, वडील, एक मोठा भाऊ, एक बहीण, काका, काकू असा मोठा आणि आप्तस्वकीय परिवार आहे. ऐन २४-२५ वर्षांच्या उंबरठ्यावर असलेल्या मुलाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

दरम्यान, दुर्गेश यांच्या पार्थिवावर रात्री ठीक ९:३० वाजेच्या सुमारास गाडेगव्हाण येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आला.

### दीपक रणनवरे...

दीक्षित, उपाध्यक्ष अनिल जोशी, सचिव विवेक नाईक, कार्याध्यक्ष घनश्याम बुवा यांची उपस्थिती होती. याशिवाय ज्येष्ठ कामगार नेते सगीर अहेमद, मीरा आष्टीकर, सुरेंद्र न्यायाधीश, चैतन्य देशमुख, विद्याधर देशमुख, प्रशांत मिश्रा, सांडूमहाराज जोशी, नंदकिशोर जोशी, मनिषा नाईक, जयप्रभा जोशी, जयंत कुलकर्णी, निरंजन वाघमारे, बाबासाहेब गुरव, किरण कुलकर्णी आदींनी रणनवरे यांची भेट घेऊन त्यांच्या उपोषणास पाठिंबा दिला.

दरम्यान, आज सांयकाळी जिल्हा सामान्य रूग्णालयातील वैद्यकीय पथकाने दीपक रणनवरे यांची आरोग्य तपासणी करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

### राहत सोशल ग्रुपतर्फे...

येणार असल्याचे आयोजकांनी कळविले आहे. विवाहाचा वाढता खर्च लक्षात घेता आर्थिकदृष्ट्या गरजू कुटुंबांना दिलासा मिळावा, विवाहाचा अनावश्यक खर्च टाळता यावा आणि सामाजिक एकतेचा संदेश देत विवाह सोहळा पार पडावा, या उद्देशाने राहत सोशल ग्रुपचा सामूहिक विवाह उपक्रम सुरू आहे.

यंदाही मोठ्या संख्येने जोडप्यांनी या सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी व्हावे आणि इच्छुक पालकांनी निर्धारित मुदतीत नावनोंदणी करून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन राहत सोशल ग्रुपचे अध्यक्ष शेख अफसर शेख यांनी केले आहे.

### धर्म जागरण...

समाजाच्या एकतेवर भर देत सांगितले की, ही कथा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून संपूर्ण हिंदू समाजाला एका सूत्रात बांधण्याची एक दिव्य संधी आहे. सर्व समाजाने जात, पंथ आणि संघटनांच्या मर्यादांच्या पलीकडे जाऊन एक हिंदू म्हणून या महायज्ञात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

आपण आधी हिंदू आहोत, नंतर समाज-अभय कुलकर्णी : प्रास्ताविकात अभय कुलकर्णी म्हणाले की, प्रत्येक समाजाची स्वतःची सामाजिक ओळख, परंपरा आणि संघटना असते आणि त्याचा सार्थ अभिमान सर्वांना असावा. परंतु, जेव्हा हिंदू समाजाच्या एकतेचा प्रश्न येतो, तेव्हा या सर्व मर्यादा ओलांडून एकत्र येणे काळाची गरज आहे. आपण आधी हिंदू आहोत, त्यानंतर आपापल्या समाजाचे घटक आहोत. ही कथा कोणत्याही एका समाजाची किंवा संस्थेची नसून संपूर्ण जालना हिंदू समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. या आयोजनात कोणालाही पैशांची विचारणा केली जाणार नसून, तुम्ही कोणती सेवा सांभाळणार? हे विचारले जाईल. त्यांनी पादत्राणे व्यवस्था, पेयजल, प्रसाद वितरण, वाहनतळ (पार्किंग), स्वच्छता, स्वयंसेवक व्यवस्था, वैद्यकीय समन्वय, प्रचार-प्रसार, महिला सेवा, ज्येष्ठ नागरिक सेवा आणि युवा सेवा अशा विविध जबाबदाऱ्या स्वीकारण्याचे आवाहन सर्व समाजांना केले. या आयोजनाची खरी जबाबदारी येणाऱ्या पिढीला घडवण्याची आहे. संपूर्ण कुटुंबाने (मुलं, तरुण, पालक आणि ज्येष्ठ नागरिक) या कथेत सहभागी व्हावे. कुटुंब मजबूत झाले तर समाज मजबूत होईल आणि समाज मजबूत झाला तर राष्ट्र बलशाली होईल. तरुणांनी केवळ प्रेक्षक न राहता सेवा आणि नेतृत्वाची धुरा हाती घ्यावी.

धर्म जागरण व हिंदू एकतेचा* *महायज्ञ-विष्णुकुमार चेचानी : कथेचा मुख्य संकल्प आणि उद्देश विशद करताना मुख्य यजमान विष्णुकुमार चेचानी म्हणाले की, २०१७ नंतर प.पू. श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या कथेचा योग जालन्याला मिळणे हे अत्यंत भाग्याचे आहे. ही कथा म्हणजे केवळ भागवत श्रवण नसून धर्म जागरण, संस्कार निर्मिती, हिंदू एकता, सामाजिक समरसता आणि राष्ट्र चेतनेचा महायज्ञ आहे. आज जालन्यात साधनांची कमतरता नाही, गरज आहे ती समाजाच्या एकतेची, सहभागाची आणि समर्पणाची, असे ते म्हणाले.

या प्रसंगी मुख्य यजमान श्री. चेचानी यांनी सप्तदिवसीय दैनिक कथा यजमान म्हणून घनश्यामदास गोयल,अरुण अग्रवाल, समीर अग्रवाल, सीए नितीन तोतला, कैलाश लोया,शिवरतन मुंदडा, राजेश सोनी, श्रीकृष्ण जन्मोत्सव यजमान म्हणून विजयजी बद्रीनारायण राठी, ५६ भोग यजमान म्हणून अशोक झंवर,रुक्मिणी विवाह यजमान म्हणून रामनिवास मानधानी यांच्या नावाची घोषणा केली. उमेश बजाज यांनी कथेच्या विविध सेवा विभागांची आणि व्यवस्थांची सविस्तर माहिती दिली. यानंतर सर्व समाज प्रतिनिधींनी आपापल्या वतीने पूर्ण सहकार्य व सक्रिय सहभागाचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन जोशी यांनी केले तर शेवटी उपस्थित सर्व संत-महंत, समाज प्रतिनिधी, पाहुणे आणि कार्यकर्त्यांचे आभार रामजी उपाध्याय यांनी मानले. या बैठकीत सर्वानुमते असा निर्धार करण्यात आला की, ही श्रीमद्भागवत कथा केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता हिंदू एकता, सामाजिक समरसता, राष्ट्रभक्ती आणि सनातन संस्कृतीच्या जागरणाचा एक विराट उत्सव ठरेल.

### होमवर्क न...

शिक्षण सभापती तथा नगरसेविका प्रेमलता दाभाडे यांनी शिक्षणाची भूमिका स्पष्ट केली. देवरत्न नाथ यांनीही विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्योजक शशिकांत काळे यांनी केले. प्रास्ताविक विलास कटारे यांनी, तर गीतगायन व आभारप्रदर्शन ॲड. सुनीलकुमार नागवंश यांनी केले. महानगरपालिकेच्या विविध शाळांतील शिक्षकांसह शेकडो प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी चंदा मगर, ॲड. राजू बागुल, ॲड. राहुल गायकवाड, ॲड. विलास रामटेके, उद्योजक मिलिंद बागुल, प्रज्ञा गायकवाड, सुभाष ठोकळ, साधू आनंद आणि डी. बी. मेश्राम यांनी विशेष प्रयत्न केले.

### बजरंग दलाच्या...

असून, पोलिसांनी दिलेल्या आश्वासनानुसार कारवाई होते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष प्रकाश पाखरे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष सुरज सोनवणे, विलास भिंगारे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांबाबत संबंधित आरोपी किंवा बजरंग दलाची बाजू या माहितीत उपलब्ध झालेली नाही. तपासादरम्यान पोलिसांकडून प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

### मासेमारीसाठी...

यांच्या अचानक झालेल्या मृत्यूची माहिती मिळताच वाल्मिक नगर परिसरात शोककळा पसरली. कुटुंबीयांना घटनेची माहिती मिळताच त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. मित्रांसोबत मासेमारीसाठी गेलेल्या तरुणाचा अशाप्रकारे दुर्दैवी अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, मोती तलावासारख्या जलाशयांच्या परिसरात नागरिकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे असून, पाण्याची खोली व प्रवाहाची माहिती नसताना पाण्यात उतरणे धोकादायक ठरू शकते. प्रशासनानेही अशा ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# एमपीएससी पेपर फुटीसह इतर पेपर फुटीचे प्रकार आस्मानावर आणि विद्यार्थ्यांच्या समस्या वाऱ्यावर;हे किती दिवस चालणार;विद्यार्थ्यांनी जगावे की मरावे!

देशासह राज्यातील पेपर फुटी प्रकरणामुळे तरुण युवकांपुढे मोठ्या गंभीर आणि जटिल समस्या निर्माण झाल्या असून सरकारने त्यांना द्विधा मनस्थितीत नेऊन ठेवले आहे.त्यामुळे देश कुठे चालला हे कळता-कळेना एवढी मोठी भयावह परिस्थिती सरकारने युवा पिढीच्या बाबतीत देशात निर्माण करून ठेवली आहे.त्यामुळे सरकार तुपाशी आणि बेरोजगार युवक उपाशी अशी गंभीर समस्या सरकारने निर्माण केली आहे.त्यामुळे युवकांपुढे एकीकडे ''विहिर तर दुसरीकडे खाई''अशी परिस्थितीत निर्माण झाली आहे.त्यामुळे ''जाये तो जाये कहा'' अशी भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे.राज्यातील एमपीएससी पेपर फुटीमुळे असह्य वेदना होत असुन नौकरीच्या बाबतीत तरूणांचा सरकारवरील विश्वास हळूहळू कमी होतांना दिसत आहे.कारण नीट,सीईटी, टीईटी,न्यायपालिकेतील ''टायपिंग स्किल'' परीक्षा, औषध निरीक्षक पदभर्ती पाठोपाठ आता ''एक्साईट'' चाही मार्किंग पॅटर्न आणि पेपर फुटीचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे.यावरून स्पष्ट होते की,राज्यात सर्वच स्तरावरील पेपर फुटीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले असून सर्वत्र जनूकाय अंधकार निर्माण झाला की काय असे सर्वत्र वातावरण दिसत आहे.कारण पेपर फुटीमध्ये पेपर काढणारे व राजकीय पुढारी यांची सर्वांचीच मिलीभगत असल्याचे दिसून येते त्यामुळेच हा प्रकार होत असावा किंवा सरकारी नौकरी भरतीच्या नावाखाली तरूणांची सरकार दिशाभूल तर करीत नाही ना असाही प्रश्न उपस्थित होत आहे.राज्यात वारंवार होत असलेल्या पेपर फुटीचा किंवा नौकरी भरतीचा होत असलेला गोंधळ पहाता असे वाटते की, राज्यातील सरकारी नौकरी भरती ही सरकारचे नाटक तर नाही ना!वारंवार पेपर फुटीच्या प्रकरणावरून असे वाटते की, सरकारला सरकारी नौकऱ्यांच्या रीक्त जागा भरायच्या आहे की नाही यात राज्याच्या जनतेच्या मनात शंका निर्माण होत आहे.कारण राज्यासह देशात सत्तेसाठी पक्ष फुटतांना आपण अनेकदा पाहिले आणि हा प्रकार नेहमीच होत असतो.परंतु सध्या राज्यात सर्वच स्तरावरील पेपर वारंवार फुटत आहेत.यामुळे विद्यार्थ्यांची मानसिकता खालावली असून त्यांच्या आयुष्यावर घणाघाती प्रहार होत आहे व अनेक जण डिप्रेशनमध्ये गेल्याचे दिसून येते.विद्यार्थांचा पेपर होतो पेपर चांगले जातात आणि नंतर अचानक पेपर फुटतो याला तर अजीबोगरीब कहानी म्हणावी लागेल.त्याचप्रमाणे हायकोर्टाच्या परिक्षेत ११५९२२ उमेदवार परीक्षा देतात त्यातून टायपिंग परीक्षेसाठी मेहनतीच्या बळावर राज्यात ११६१७ उमेदवार पात्र ठरतात आणि याही ठिकाणी सर्वच सेंटरवर मोठ्या प्रमाणात उमेदवार गोंधळतात यावरून स्पष्ट होते की, परीक्षा व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात तांत्रिक तृटी निर्माण होते व ज्यांना २० पैकी १० ते १५ मार्क मिळण्याची शक्यता असते त्यांना फक्त १ ते ५ मार्क मिळतात ही कसली परीक्षा पध्दत म्हणावी?हायकोर्टाच्या टायपिंग टेस्टच्या बाबतीत असेही सांगितले जाते की काही ठिकाणी टायपिंग टेस्टचा पेपर फुटल्याचे सांगितले जाते.अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी किंवा बेरोजगार तरुणांनी कोणावर विश्वास ठेवावा यावर सुद्धा सरकारच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित होतो.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बाबतीत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की,''जाये तो जाये कहा'' अशी कठीण समस्या दिसून येते.एमपीएससी परीक्षा नेहमी पारदर्शी पद्धतीने व्हायची आणि त्यावर सर्वांचाच विश्वास होता.परंतु आता यातही मोठे भगदाड पडले असुन पेपरफुटी दिसून आली हे राज्याच्या विद्यार्थ्यांच्या व बेरोजगार तरुणांनांच्या दृष्टीने अत्यंत दुर्भाग्यपूर्ण व दुःखद बाब आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने खाद्य एवं औषधी प्रशासन विभाग यामध्ये औषधी निरीक्षक (डीआई) समूह -बी या पदाचा पेपर फुटल्याने औषधी निरीक्षक भर्ती प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगावर प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे.असे सांगितले जाते की,औषधी निरीक्षक भर्ती परीक्षेची प्रश्नपत्रिका राज्यभरात सक्रिय एजंट मार्फत उमेदवारांना ४०-४० लाख रूपयांत विकण्यात आल्याचे सांगितले जाते. आज राज्यात सरकारी नौकरीच्या लाखो जागा खाली आहेत.परंतु सरकारची नियत साफ नसल्याचे पेपर फुटीचा घृणास्पद प्रकारावरून दिसून येते.हा सर्व प्रकार सरकार आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.परंतु गुन्हेगारांवर कठोर शिक्षा किंवा फाशी होत नाही हे राज्याचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.औषध निरीक्षक पाठोपाठ आता ''एक्साईज'' चाही मार्किंग पॅटर्न आणि पेपर फुटीचा खळबळजनक आरोप होत आहे.यावरून स्पष्ट होते की राज्यात नौकरी भरतीच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असुन सरकार फक्त चौकशीची भाषा किंवा समिती तयार करून हात झटकण्याचे काम करीत आहेत ही तरुण युवकांसाठी मोठी समस्या निर्माण झाली आहे.कारण राज्यात पेपर फुटीचे प्रकार दिवसेंदिवस वाढतच आहे;राज्यात पेपर फुटीवरून असे निदर्शनास येते की, सरकारला रीक्त पदे भरायचेच नाही की काय! असे दिसून येते.अशा परिस्थितीत योग्यता प्राप्त विद्यार्थ्यांचा यात नंबर लागणार की नाही हाही प्रश्नच आहे.वरील प्रकरणामुळे सरकारने विद्यार्थ्यांच्या भविष्यापूढे मोठे प्रश्न चिन्ह निर्माण केला आहे.कारण सध्याच्या परिस्थितीत सरकार देशातील आणि राज्यातील राजकारणात पक्ष फुटी,आमदार-खासदार फुटी यावर अवलंबून आहे.त्याचीच पुनरावृत्ती सरकार पेपर फुटीच्या माध्यमातून तरूण विद्यार्थ्यांची व बेरोजगार युवकांची अवहेलना करून स्लोपॉयझनच देण्याचे काम सरकार करीत आहे.अशा गंभीर परिस्थिती अनेक बेरोजगार युवावर्ग डिप्रेशनमध्ये जाऊ शकतो यालाही नाकारता येत नाही.



राज्यासह देशात जेन-झी व जेन अल्फां चे हालबेहाल होत आहे, तर दुसरीकडे सरकारने सुभाष चंद्रांना २२ हजार कोटींची कर्जमाफी जाहीर केल्याचे सांगितले जाते.यामुळे कर्ज देणारी एचडीएफसी बँक व एलआयसी सरकारवर आक्रमक झाल्याचे दिसून येते.हाच पैसा सरकारने शाळा महाविद्यालये किंवा आरोग्य सुविधांसाठी वापरला असता तर देशाचा विकास झाला असता.

अशाप्रकारे देशाचा अरबोखरबो रूपया पुंजीपतींच्या घश्यात सरकारने टाकुन देशातील युवकांपुढे गंभीर समस्या निर्माण केल्या आहेत.यावरून स्पष्ट होते की, देशाला भ्रष्टाचाराने सर्वत्र जखडले आहे याचे प्रायचित्य आज युवा पिढी पेपर फुटीच्या रूपात भोगत आहे.त्यामुळे पेपर फुटीचे ग्रहण केव्हा सुटणार याची चिंता आज सर्वांना लागली आहे. जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व : प्रणव मुखर्जी

भारताचे माजी राष्ट्रपती, ज्येष्ठ राजकीय नेते, कुशल प्रशासक आणि संसदीय परंपरांचे गाढे अभ्यासक प्रणव मुखर्जी यांचा आज स्मृतिदिन. ३१ ऑगस्ट २०२० रोजी वयाच्या ८४व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील एक प्रदीर्घ पर्व संपले. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांमध्ये समान आदराचे स्थान असलेले प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एक अजातशत्रू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात.

जवळपास पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी सार्वजनिक जीवनात सक्रिय राहून भारतीय राजकारण, प्रशासन आणि संसदीय लोकशाहीला मोलाचे योगदान दिले. त्यांचे ज्ञान, अनुभव, संयमी स्वभाव, विलक्षण स्मरणशक्ती आणि विविध विषयांवरील सखोल अभ्यास यामुळे त्यांना भारतीय राजकारणातील 'चालती-बोलती लायब्ररी' असे संबोधले जात असे.

११ डिसेंबर १९३५ रोजी पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यातील मिराटी येथे प्रणव मुखर्जी यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कामदा किंकर मुखर्जी हे स्वातंत्र्यसैनिक आणि काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते होते. त्यांनी ब्रिटिशांविरुद्धच्या स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला आणि कारावासही भोगला. त्यामुळे लहानपणापासूनच प्रणव मुखर्जी यांच्यावर देशभक्ती, सार्वजनिक सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे संस्कार झाले.

प्रणव मुखर्जी यांनी कोलकाता विद्यापीठातून इतिहास आणि राज्यशास्त्र विषयांत पदव्युत्तर शिक्षण घेतले तसेच कायद्याची पदवी मिळवली. राजकारणात येण्यापूर्वी त्यांनी काही काळ अध्यापन केले आणि पत्रकारितेच्या क्षेत्रातही काम केले. मात्र त्यांच्या मनात सार्वजनिक जीवनाची ओढ होती. १९६९ मध्ये त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला आणि अल्पावधीतच आपल्या बुद्धिमत्ता, अभ्यासू वृत्ती, वक्तृत्व आणि संघटनकौशल्याच्या जोरावर राष्ट्रीय राजकारणात आपली वेगळी ओळख निर्माण केली.

राज्यसभेचे सदस्य म्हणून त्यांच्या संसदीय कारकिर्दीची सुरुवात झाली. पुढे त्यांनी केंद्र सरकारमध्ये अनेक महत्त्वाची खाती सांभाळली. अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, वाणिज्यमंत्री अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. संसदीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आणि प्रशासनातील सखोल जाण यामुळे ते केंद्र सरकारमधील अत्यंत विश्वासार्ह नेत्यांपैकी एक बनले.

अर्थव्यवस्था, परराष्ट्र धोरण, संरक्षण, अंतर्गत सुरक्षा, संसदीय प्रक्रिया आणि घटनात्मक बाबी या विविध विषयांवर त्यांचे प्रभुत्व होते. संसदेतील विविध समित्यांच्या कामकाजातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कोणत्याही विषयावर चर्चा करताना त्यांची तयारी, आकडेवारीवरील पकड आणि घटनात्मक तरतुदींचे ज्ञान पाहून अनेक जण प्रभावित होत असत.

प्रणव मुखर्जी यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ सत्ताधारी पक्षाचे नेते नव्हते. संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाचे महत्त्व त्यांना पूर्णपणे मान्य होते. त्यामुळे विविध पक्षांतील नेत्यांशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. मतभेद असले तरी मनभेद नसावेत, ही त्यांच्या राजकीय वर्तनाची शैली होती. म्हणूनच ते सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांमध्ये समान आदराचे पात्र ठरले.

२०१२ मध्ये प्रणव मुखर्जी भारताचे तेरावे राष्ट्रपती झाले. राष्ट्रपतीपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी या सर्वोच्च घटनात्मक पदाची प्रतिष्ठा आणि गांभीर्य कायम राखले. राष्ट्रपती म्हणून त्यांनी संविधानाच्या चौकटीत राहून आपल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. देशातील विविध विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, युवक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

राष्ट्रपती भवन हे केवळ औपचारिक वास्तू न राहता लोकांशी संवाद साधणारे आणि ज्ञान-विचारांचे केंद्र व्हावे, यासाठीही त्यांनी अनेक उपक्रमांना प्रोत्साहन दिले. राष्ट्रपती म्हणून त्यांनी भारतीय लोकशाही, संविधान, शिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या मूल्यांवर सातत्याने भर दिला.

प्रणव मुखर्जी यांना २००८ मध्ये पद्मविभूषण आणि २०१९ मध्ये देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान करण्यात आला. त्यांच्या दीर्घ सार्वजनिक जीवनाचा आणि राष्ट्रसेवेचा हा मोठा गौरव होता.

प्रणव मुखर्जी यांच्या व्यक्तिमत्त्वात राजकारणी, संसदपटू, प्रशासक, अभ्यासक आणि शिक्षक या सर्व भूमिका एकत्रित झाल्या होत्या. त्यांना इतिहासाची जाण होती, वर्तमानाची समज होती आणि भविष्यातील आव्हानांचा वेध घेण्याची दूरदृष्टी होती. संसदीय परंपरांचा त्यांनी केवळ अभ्यास केला नाही, तर त्या प्रत्यक्ष आचरणात आणल्या.

३१ ऑगस्ट २०२० रोजी दिल्ली येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील एक अनुभवी, संयमी आणि विद्वान व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही.

आजच्या राजकारणात मतभेदांबरोबरच वैयक्तिक कटुता वाढताना दिसते. अशा काळात प्रणव मुखर्जी यांची राजकीय कारकीर्द अधिकच महत्त्वाची ठरते. अभ्यास, संयम, संवाद, संसदीय शिष्टाचार आणि लोकशाहीवरील निष्ठा या मूल्यांच्या आधारेही राजकारण करता येते, हे त्यांनी आपल्या दीर्घ सार्वजनिक जीवनातून सिद्ध केले.

भारतीय राजकारणातील या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचे योगदान भारतीय लोकशाहीच्या इतिहासात सदैव स्मरणात राहील. त्यांच्या स्मृतिदिनी या महान संसदपटू, अभ्यासू राजकारणी आणि भारतरत्न प्रणव मुखर्जी यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे पट्टे देऊन थांबणार नाही, तर मूलभूत सुविधाही पुरविणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर - प्रतिनिधी**

झोपडपट्टीतील रहिवाशांना मोठ्या प्रमाणात मालकी हक्काचे पट्टे देणारे नागपूर हे देशातील एकमेव शहर आहे. मात्र आम्ही फक्त मालकी हक्काचे पट्टे देऊन थांबणार नाही, तर या वसाहतींमध्ये मूलभूत सुविधा देऊन तेथील रहिवाशांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. नागपूर शहरातील झोपडपट्टीधारकांना हक्काचे मालकी पट्टे मिळवून देऊन त्यांना सन्मानाने जगता यावे म्हणून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केलेले प्रयत्न आणि त्याअनुषंगाने झालेले निर्णय या संपूर्ण प्रक्रियेवर सीएफएसडी (सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट) च्या लीना बुद्धे यांनी लिहिलेल्या 'फूटप्रिंट्स ऑफ डिग्निटी : बिल्डिंग टेन्युअर राइट्स इन अर्बन स्लम्स ऑफ इंडिया' या पुस्तकाचे प्रकाशन आज 'रामगिरी' येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. झोपडपट्टीतील रहिवाशांना मालकीपट्टे मिळणे अतिशय आवश्यक होते. ते दिल्यामुळे त्यांचे जीवन बदलल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, त्यांचा सर्वसमावेशक विकास होण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. झोपडपट्टी विकासासाठी हे पुस्तक दिशादर्शक असणार आहे. मी नागपूरचा महापौर असतानाच या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आले होते. त्यामुळे पुढे आमदार म्हणूनही हा विषय लावून धरला.

या क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून काम करणाऱ्या या पुस्तकाच्या लेखिका लीना बुद्धे यांनीही हा गुंतागुंतीचा विषय अभ्यासपूर्ण मांडला. मुख्यमंत्री झाल्यानंतर मालकी पट्टे देण्याचा मी निर्णय घेतला. अनेक खासगी जागांवरही झोपडपट्ट्या वसल्या आहेत. त्यांच्या नियमितीकरणासाठीही शासनाने निर्णय घेतला. या संपूर्ण प्रक्रियेचे या पुस्तकामुळे दस्तावेजीकरण झाले आहे असे सांगत मुख्यमंत्र्यांनी लेखिका श्रीमती बुद्धे यांचे अभिनंदन केले.

# गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानातील कामांना नव्या 'टाइमलाईन'ने गती द्या - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## विदर्भातील महत्त्वाचे पर्यटन केंद्र म्हणून गोरेवाड्याचा विकास व्हावा

**नागपूर -प्रतिनिधी**

हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाचा नियोजनबद्ध आणि सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोरेवाडा प्रकल्पाची पाहणी करून विविध कामांचा सविस्तर आढावा घेतला. आफ्रिकन सफारी सुरू करण्यासाठी सुरू असलेल्या कामांची सद्यस्थिती, प्रकल्पाची प्रगती आणि सफारी सुरू करण्याचे अपेक्षित वेळापत्रक याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. गोरेवाड्यात सुरू असलेल्या सर्व कामांसाठी नव्याने स्पष्ट कालमर्यादा निश्चित करून त्यानुसार कामांना गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

गोरेवाडा येथील वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्रातील वसंतराव नाईक प्रशासकीय इमारतीत आज आयोजित आढावा बैठकीला वनमंत्री गणेश नाईक, खासदार माया इनवाते, वनविभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक(वनबल प्रमुख) एम. श्रीनिवास राव, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस अधीक्षक ग्रामीण हर्ष पोद्दार, वाईल्डलाइफ रेस्क्यू व ट्रेनिंग सेंटरचे संचालक शिरीष उपाध्ये, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, विभागीय व्यवस्थापक तथा प्राणीसंग्रहालय संचालक पांडुरंग पाखले यांच्यासह वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गोरेवाडा प्रकल्पातील विविध कामांची माहिती घेताना संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. आफ्रिकन सफारी हा गोरेवाडा प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा आणि अन्य कामांची पूर्तता कोणत्या टप्प्यावर आहे, याची माहिती त्यांनी जाणून घेतली. आफ्रिकन सफारी सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली कामे निश्चित करून त्यांची पूर्तता कालबद्ध पद्धतीने करण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

वनविभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी गोरेवाडा प्रकल्पाची आतापर्यंतची वाटचाल, प्रकल्पाची सद्यस्थिती आणि सुरू असलेल्या विविध कामांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. सादरीकरणात देण्यात आलेल्या माहितीनुसार, गोरेवाडा प्रकल्पाचा पहिला टप्पा २०२१ मध्ये पूर्ण करण्यात आला आहे. या टप्प्यात वाइल्डलाइफ रेस्क्यू सेंटर, इंडियन सफारी आणि एंट्रन्स प्लाझा यांचा समावेश आहे.

पहिल्या टप्प्यातील ही कामे पूर्ण झाल्यानंतर गोरेवाडा प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील विविध सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. आफ्रिकन सफारीसह महत्त्वाची कामे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात समाविष्ट आहेत. वॉकिंग ट्रेल, आफ्रिकन सफारी, सफारी प्लाझा, ॲनिमल हॉस्पिटल आणि क्वारंटाईन ब्लॉक यांचा समावेश असल्याची माहिती सादरीकरणाद्वारे देण्यात आली. यातील आफ्रिकन सफारीच्या कामाच्या प्रगतीबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विशेष माहिती जाणून घेतली. सफारी सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली कामे, त्यांची सद्यस्थिती आणि पुढील नियोजन यांचा त्यांनी आढावा घेतला. आफ्रिकन सफारी कधी सुरू करता येईल, याबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेत या कामाला गती देण्याचे निर्देश दिले.

प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यात ट्रेल ऑफ सेन्सेस, बायोपार्क, नाईट झू, गोंडवाना पार्क, बायो डिस्कव्हरी प्लाझा आणि ट्रायबल ट्रेल यांचा समावेश असल्याची माहिती सादरीकरणात देण्यात आली. या विविध सुविधांच्या माध्यमातून गोरेवाडा प्रकल्पाचा वन्यजीव पर्यटनासोबतच जैवविविधता, निसर्ग आणि स्थानिक संस्कृतीचा अनुभव देणारे महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याची संकल्पना मांडण्यात आली.

प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी अनुभवी आणि सक्षम सल्लागाराची नियुक्ती करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले. गोरेवाड्याचा विकास करताना दीर्घकालीन पर्यटनाच्या गरजा लक्षात घेऊन नियोजन करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

ताडोबा आणि पेंच येथे येणाऱ्या पर्यटकांनी गोरेवाड्यात एक ते दोन दिवस पर्यटनासाठी घालवावेत, या दृष्टीने गोरेवाड्याचा विकास करण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. ताडोबा आणि गोरेवाडा या दोन्ही पर्यटनस्थळांना जोडणारे प्रभावी नियोजन करून पर्यटकांचा मुक्काम वाढेल, अशा पद्धतीने सुविधा विकसित करण्याची सूचना त्यांनी केली.

गोरेवाडा प्रकल्पात वन्यजीव पर्यटनासोबत पर्यटकांना विविध अनुभव देणाऱ्या सुविधा विकसित करून विदर्भातील महत्त्वाचे पर्यटन केंद्र म्हणून गोरेवाड्याची ओळख निर्माण करण्यासाठी नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.

गोरेवाडा प्राणी उद्यानाची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी प्रकल्पातील विविध सुविधांची आणि सुरू असलेल्या कामांची माहिती त्यांनी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली. प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली.







गणपती बाप्पाचे आगमन अवघ्या १४ दिवसावर येऊन ठेपले असून मूर्तिकार मूर्तीवर शेवटचा हात फिरवताना दिसत आहे व सेल्फी काढणारा गणपती मोटार मध्ये बसलेला गणपती अशा विविध प्रकारच्या मुर्त्या उपलब्ध आहेत छायाचित्र किरण खानापुरे

# राहत सोशल ग्रुपतर्फे २९ नोव्हेंबरला २५वा मुस्लिम सामूहिक विवाहसोहळा

## इच्छुक पालकांनी १५ नोव्हेंबरपूर्वी मुला-मुलींची नावे नोंदवावीत; अध्यक्ष शेख अफसर शेख यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

राहत सोशल ग्रुप, जालना यांच्या वतीने यंदाचा २५वा मुस्लिम सामूहिक विवाहसोहळा रविवार, २९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता कदीम जालना येथील उर्दू हायस्कूलच्या मागील आयेशा लान्स येथे आयोजित करण्यात आला आहे. आर्थिकदृष्ट्या गरजू कुटुंबांना विवाहाचा खर्च परवडावा आणि सामूहिक पद्धतीने विवाह सोहळा पार पडावा, या उद्देशाने गेल्या २५ वर्षांपासून राहत सोशल ग्रुपतर्फे हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

यंदाच्या सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पालकांनी १५ नोव्हेंबर २०२६ पूर्वी आपल्या मुला-मुलींची नावे नोंदवावीत, असे आवाहन राहत सोशल ग्रुपचे अध्यक्ष शेख अफसर शेख यांनी केले आहे. राहत सोशल ग्रुप जालना गेल्या २५ वर्षांपासून मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करीत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत ६०० हून अधिक मुस्लिम जोडप्यांचे विवाह सामूहिक पद्धतीने पार पडल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली.

सामाजिक बांधिलकीतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला दरवर्षी नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, गरजू कुटुंबांना विवाहाच्या माध्यमातून मदत मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.



सामूहिक विवाह सोहळ्यासाठी नोंदणी करताना वधू-वरांच्या वयाची आवश्यक कागदपत्रे सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. वराचे वय २१ वर्षे आणि वधूचे वय १८ वर्षे पूर्ण असल्याचे प्रमाणित प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रे नोंदणीच्या वेळी सादर करावी लागणार आहेत.

पालकांनी नोंदणीपूर्वी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून वेळेत अर्ज करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

राहत सोशल ग्रुपच्या वतीने सामूहिक विवाह सोहळ्यात विवाहबद्ध होणाऱ्या नवविवाहित जोडप्यांना संसार सुरू करण्यासाठी आवश्यक विविध वस्तू भेटस्वरूपात देण्यात येणार आहेत. यामध्ये पलंग, अंथरूण-पांघरूण, भांडी-बरणी तसेच दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या विविध संसारोपयोगी वस्तूंचा समावेश आहे.

विवाहानंतर नवदाम्पत्याला संसार उभा करण्यासाठी सुरुवातीला आवश्यक असणाऱ्या वस्तू उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने दरवर्षी संस्थेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येतो. सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पालकांनी शेवटच्या क्षणाची प्रतीक्षा न करता १५ नोव्हेंबरपूर्वीच नावे नोंदवावीत, असे आवाहन राहत सोशल ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

नावनोंदणीसाठी राहत सोशल ग्रुपचे अध्यक्ष शेख अफसर शेख जी ०९४२२२१८२२०, संस्थापक सचिव लियाकत अली खान यासिर जालनावी ०९४२२७२४२५७, उपाध्यक्ष शेख सलीम शेख मुहम्मद ०९४२२७३७००२ यांच्याशी संपर्क साधता येणार आहे.

तसेच न्यू भारत ट्रेडर्स, पेट्रोल पंपासमोर, संत गाडगेबाबा कॉम्प्लेक्स, बस स्टँड रोड, जालना येथे राहत सोशल ग्रुपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडेही नावनोंदणी करता (पान २ वर)

# धर्म जागरण, संस्कार निर्मिती आणि हिंदू एकतेचा संकल्प; विविध समित्या गठीत

## भागवत कथेच्या नियोजनासाठी सकल हिंदू समाजाची संयुक्त बैठक संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

भक्ती ज्ञान गंगा श्रीमद्भागवत कथा समितीच्यावतीने २० ते २६ सप्टेंबर या कालावधीत जालन्यातील मंठा रोडवरील आई साहेब लॉनमध्ये आयोजित करण्यात प. पू. श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या श्रीमद्भागवत कथेच्या पूर्वतयारी व यशस्वी नियोजनासाठी रविवार दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी वाजता महेश भवन येथे सकल हिंदू समाजाची एक भव्य व ऐतिहासिक संयुक्त बैठक उत्साहात संपन्न झाली. त्यात विविध समाजांनी सेवांची जबाबदारी स्वीकारत धर्म जागरण, संस्कार निर्मिती आणि हिंदू एकतेचा संकल्प केला.



या बैठकीत मराठा समाज, अग्रवाल समाज, माहेश्वरी समाज, दायमा समाज, ब्राह्मण समाज, सिंधी समाज, गुजराती समाज, माळी समाज, बौद्ध समाज, जैन समाज, श्रीमाळी समाज, वारकरी समाज, राजपूत समाज, गौड समाज, तेली समाज, विप्र समाज तसेच अहिर-गवळी समाजासह जालन्यातील विविध सामाजिक व धार्मिक संघटनांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवला.

या बैठकीस आर.पी. रोडवरील राम मंदिराचे प. पू. मनोज महाराज गौड आणि जुना जालना राम मंदिराचे प. पू. रामदासी महाराज प्रमुख अतिथी व आशीर्वचनकर्ते म्हणून उपस्थित होते. आपल्या आशीर्वचनात दोन्ही संतांनी हिंदू (पान २ वर)

# बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांवरील कारवाईसाठी वंचित बहुजन आघाडी आक्रमक

**जालना । प्रतिनिधी**

परमेश्वर हिवाळे यांच्यावर बजरंग दलाच्या काही कार्यकर्त्यांनी गोरक्षेच्या नावाखाली अमानुषपणे शेण चारून, जातीवाचक शिवीगाळ व मारहाण केल्याचा आरोप असलेल्या प्रकरणात संबंधित आरोपींवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडी आक्रमक झाली आहे. या प्रकरणातील आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे राज्य कार्यकारिणी सदस्य दिपक डोके यांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणातील संबंधित आरोपींना दोन दिवसांत अटक करण्यात येईल, असे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी दूरध्वनीवरून कळविल्याची माहिती दिपक डोके यांनी दिली आहे.



रविवार, ३० ऑगस्ट रोजी दिपक डोके यांनी जालना शहरातील नूतन वसाहत येथे परमेश्वर हिवाळे यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांची विचारपूस केली. यावेळी घटनेबाबत कुटुंबीयांकडून माहिती जाणून घेत त्यांना धीर देण्यात आला. परमेश्वर हिवाळे यांच्यावर २३ मे २०२६ रोजी कन्हैया नगर , जालना येथे गोरक्षेच्या नावाखाली बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी अमानुष वर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामध्ये शेण चारणे, जातीवाचक शिवीगाळ करणे आणि मारहाण केल्याचा आरोप आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून हिवाळे यांची बदनामी करण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी २१ ऑगस्ट २०२६ रोजी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली.

गुन्हा दाखल होऊनही संबंधित आरोपींवर तातडीने कारवाई झालेली नसल्याचा आरोप करत वंचित बहुजन आघाडीने पोलिसांकडे अटकेची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर दिपक डोके यांनी जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. यावेळी प्रकरणातील संबंधित आरोपींना दोन दिवसांत अटक केली जाईल, असे पोलीस अधीक्षकांनी सांगितल्याची माहिती डोके यांनी दिली. पोलिसांकडून आरोपींवर कायदेशीर कारवाई होऊन पीडिताला न्याय मिळेपर्यंत या प्रकरणाचा पाठपुरावा सुरूच ठेवण्यात येईल, अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीने घेतली आहे.

जातीय अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये पीडितांना न्याय मिळणे आवश्यक आहे. कोणत्याही व्यक्तीवर कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन अत्याचार होत असल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. परमेश्वर हिवाळे कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी वंचित बहुजन आघाडी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील, असे दिपक डोके यांनी सांगितले.

संबंधित आरोपींवर कायदेशीर कारवाई होईपर्यंत या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात येणार (पान २ वर)

# होमवर्क न केल्याने विद्यार्थ्यांना मारहाण करणे हा उपाय नाही : डॉ. ए. ए. कादरी

## नशाखोरी व गुन्हेगारीच्या निर्मूलनासाठी मोफत वैचारिक समुपदेशनात्मक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

नशाखोरी आणि गुन्हेगारी रोखण्यासाठी केवळ कायदेशीर कारवाई पुरेशी नसून वैचारिक प्रबोधन, वैद्यकीय-मानसशास्त्रीय समुपदेशन आणि प्रभावी प्रशासकीय उपायांची सांगड घालणे आवश्यक आहे, असे मत सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. ए. ए. कादरी यांनी व्यक्त केले. ''होमवर्क न केल्याने विद्यार्थ्यांना मारहाण करणे हा उपाय नाही. समोरील व्यक्तीचा अपमान करण्याऐवजी त्याचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.



फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त व गुन्हेमुक्त समाज निर्मितीसाठी वैचारिक प्रबोधन, वैद्यकीय समुपदेशन आणि प्रभावी प्रशासनसामाजिक सलोख्याच्या दिशेने एक मानवतावादी दृष्टिकोन' या विषयावर १८८ वी शतकोत्तर मोफत वैचारिक समुपदेशनात्मक कार्यशाळा डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयातील मुट कोर्ट हॉलमध्ये शनिवारी पार पडली. अध्यक्षस्थानावरून फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम यांनी सांगितले की, व्यक्तीला नशा असावी ती चांगल्या कृतीची. इतरांचे म्हणणे ऐकून घेण्याची आणि सज्ञान विचार स्वीकारण्याची वृत्ती विकसित झाली, तर गुन्हेगारी प्रवृत्ती कमी होण्यास मदत होईल. नशायुक्त पदार्थांची उपलब्धता रोखण्याबरोबरच बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणे, शिक्षणाचा दर्जा उंचावणे आणि प्रतिबंधात्मक समुपदेशनाला प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.उद्घाटनप्रसंगी एसीपी नरेंद्र पडळकर यांनी विद्यार्थ्यांच्या कलानुसार त्यांना संधी द्यावी, अनावश्यक दबाव टाकू नये, असे आवाहन केले. डॉ. कादरी म्हणाले की, प्रत्येक नशेखोर व्यक्ती गुन्हेगार असेलच असे नाही. कुटुंब, समाज आणि नातेवाईक व्यक्तीच्या मानसिक जडणघडणीवर परिणाम करतात. रागाची सहनशीलता संपली की अनेकदा गुन्हा घडतो. त्यामुळे सुसंवाद, समन्वय आणि सकारात्मक विचारांची मशागत आवश्यक आहे. शिक्षकांनीही 'मरेपर्यंत शिकत राहिले पाहिजे', असे त्यांनी नमूद केले. ''ज्या समाजात दवाखाने, पोलीस ठाणी आणि न्यायालयांची गरज कमी असते, त्या समाजाचे सामाजिक स्वास्थ्य चांगले असते,'' असेही त्यांनी सांगितले.

प्राचार्य प्रमोद हेरोडे यांनी, माणूस जन्मतः गुन्हेगार नसतो; परिस्थिती त्याला गुन्हेगारीकडे ढकलू शकते, असे मत व्यक्त केले. (पान २ वर)

# मासेमारीसाठी मोती तलावात गेलेल्या तरुणाचा बुडून मृत्यू

## चार मित्रांसोबत गेला होता मासे पकडण्यासाठी; अचानक पाण्यात बुडाला: बोटीच्या सहाय्याने मृतदेह बाहेर काढला

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील मोती तलावात मासे पकडण्यासाठी गेलेल्या एका तरुणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी (२९ ऑगस्ट) सायंकाळी सहा ते सात वाजेच्या सुमारास घडली. शेख बशीर शेख याशीन (वय अंदाजे ४० वर्षे, रा. वाल्मिक नगर, जालना) असे मृत तरुणाचे नाव आहे. शेख बशीर हे विद्युत विभागात कंत्राटी स्वरूपात काम करत असल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शेख बशीर हे आपल्या चार मित्रांसह शनिवारी मोती तलाव परिसरात मासेमारी करण्यासाठी गेले होते. मासे पकडताना ते तलावाच्या पाण्यात काही अंतरापर्यंत पुढे गेले. मात्र, पाण्याची खोली आणि परिस्थितीचा अंदाज न आल्याने ते अचानक पाण्यात बुडाले. काही क्षणांतच ते मित्रांच्या नजरेआड झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

शेख बशीर हे मित्रांसोबत मासेमारी करत असल्याने सुरुवातीला सर्व काही सुरळीत होते. मात्र, मासे पकडण्यासाठी पाण्यात पुढे गेल्यानंतर अचानक ते बुडू लागले. त्यांनी पाण्यातून बाहेर येण्याचा प्रयत्न



केला; मात्र त्यांना पोहून काठावर येता आले नाही. डोळ्यादेखत मित्र पाण्यात बुडाल्याने सोबतच्या मित्रांमध्ये घबराट पसरली.

घटनेची माहिती मिळताच तलाव परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. काही नागरिकांनी स्वतःच्या पातळीवर त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, तलावातील पाण्याची खोली आणि अंधारामुळे शोध घेण्यात अडचणी निर्माण होत होत्या.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान आवश्यक साहित्य आणि बोटीसह घटनास्थळी दाखल झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जवानांनी तातडीने तलावात शोधमोहीम सुरू केली. बोटीच्या सहाय्याने तलावात गळ टाकून तसेच विविध ठिकाणी शोध घेण्यात आला. पाण्याची खोली आणि अंधारामुळे जवानांसमोर मोठे आव्हान होते. तरीही जवानांनी अथक प्रयत्न सुरू ठेवले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तब्बल एक तास शोधमोहीम राबवल्यानंतर शेख बशीर यांचा मृतदेह शोधून काढला. त्यानंतर मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आला. या घटनेची माहिती परिसरात पसरताच मोती तलाव परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली. दरम्यान, या घटनेमुळे तलाव परिसरातील सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. तलावात मासेमारी करण्यासाठी किंवा अन्य कारणांसाठी नागरिक जात असतील, तर अशा ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजना कितपत आहेत, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर चंदनझिरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पुढील वैद्यकीय कार्यवाहीसाठी जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला आहे. या घटनेची पोलिसांकडून नोंद घेण्याचे काम सुरू असून, तरुणाचा मृत्यू नेमका कोणत्या परिस्थितीत झाला, याबाबत पुढील तपास केला जात आहे.

शेख बशीर (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.